# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in


## जाहीर नोटीस

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ आणि (पारेषण मुक्त प्रवेश) विनियम, २०१६ मधील प्रस्तावित सुधारणांवर अभिप्राय मागविण्याबाबत

**जाहिरात क्र. --- /२०१९**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग आपल्या वितरण मुक्त प्रवेश आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ मधील मुख्यत्वे पात्रता, बॅन्कींग, करांतर्गत मागणीत सुधारणा, पारेषण आकार लागू करण्यासाठी उपाययोजना आणि वहन आकार इ. संबंधातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा विचार करीत आहे.

विनियमांमधील या प्रस्तावित सुधारणांचे प्रारुप, स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह आयोगाच्या www.merc.gov.in / www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

आयोग, वरील प्रारुप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित असून त्या ६ (१+५) प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४००००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६ किंवा mercindia@merc.gov.in या ई-मेल द्वारा पाठवाव्यात.

**दि. १ एप्रिल, २०१९** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती विनियमांतील या सुधारणेस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

सचिव, मविनिआ

मुंबई,

दिनांक : ११ मार्च, २०१९